# पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

आरोग्य खात्याकडील पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका यांच्या गाडीखाना येथील प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिटकरिता पुणे मनपा रुग्णालयांतील FICTC केंद्रांकडे नेमणुकीसाठी खालील अस्थायी पदांवर ६ महिन्यांकरिता करार पद्धतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने खालील पदे तोंडी मुलाखत पद्धतीने भरणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १ | समुपदेशक | रु. २२,३६५/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण व मास्टर ऑफ सोशल वर्कची (MSW) पदवी उत्तीर्ण.<br>२) एच.आय.व्ही. एड्सविषयक समुपदेशनाचा किमान ३ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक. | ११ | अ. जा.- २, अ. ज. -१, वि.मा.प्र.- १, इ.मा.व- २ ई.डब्ल्यू.एस.- १, अराखीव (खुला)-४ |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | रु. २२,३६५/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शास्त्र शाखेची पदवी (बी.एस.सी.) व डी.एम.एल.टी. उत्तीर्ण.<br>२) एच.आय.व्ही. रक्तचाचणी कामाचा लॅबोरेटरीमधील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | १ | १ सर्वांसाठी खुला (आरक्षण नाही) |

वरील पदांकरिता वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र, १ ला मजला, ६६३ शुक्रवार पेठ, गाडीखाना, पुणे ४११००२ येथे जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पुढील ८ दिवसांपर्यंत सोमवार ते शुक्रवार (शासकीय सुट्टी वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत समक्ष अर्ज सादर करावयाचा आहे. उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने अटी व शर्ती व इतर आवश्यक बाबी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/-

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)**
**तथा सहअध्यक्ष,**
पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे महानगरपालिका

**जाहिरात क्र. १/५७, दि. २१/०६/२०२४**